**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. यशवंत ग्यानबा ननावरे
रा. लेन नं.३, गोकुळनगर, — अपीलकर्ता
कात्रज-कोंढवा, पुणे

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
पोलिस उप आयुक्त परिमंडळ-२, — उत्तरवादी
पुणे शहर, पुणे

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलिस आयुक्त,
स्वारगेट विभाग, पुणे
श्री. एस. पी. जाधव

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.६.२००७ |
| ३ | उपस्थित | जन माहिती अधिकारी तथा<br>सहाय्यक पोलिस आयुक्त,<br>स्वारगेट विभाग, पुणे<br>श्री. एस. पी. जाधव |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.४.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.५.२००७ |

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. यशवंत ग्यानबा ननावरे
रा. लेन नं.३, गोकुळनगर,
कात्रज-कोंढवा, पुणे
अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
पोलिस उप आयुक्त परिमंडळ-२,
पुणे शहर, पुणे
उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलिस आयुक्त,
स्वारगेट विभाग, पुणे
श्री. एस. पी. जाधव

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.६.२००७ |
| ३ | उपस्थित | जन माहिती अधिकारी तथा<br>सहाय्यक पोलिस आयुक्त,<br>स्वारगेट विभाग, पुणे<br>श्री. एस. पी. जाधव |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.४.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.५.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | सहकारनगर पो. स्टे. गुरनं. ४३०/०७ भा.द.वि. क. ३०२, २०१, २०२ बाबत पोलीस प्रॉसिक्युटर यांच्या अहवालाची प्रत |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. यशवंत ग्यानबा ननावरे यांनी पुण्यातील सहकारनगर पोलिस ठाण्यात त्यांच्यावर दाखल झालेल्या खुनाच्या गुन्ह्यासंबंधी पोलिस आयुक्त कार्यालयातील सरकारी अभियोक्ता (पोलिस प्रॉसिक्युटर ) यांनी दिलेल्या अभिप्रायाची (opinion) छायांकित प्रत मागितली होती. परंतू तपास कामात अडथळा येऊ नये या व तद्नंतर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याच्या कारणावरून जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे श्री. एस. पी. जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उप आयुक्त परिमंडळ-२, पुणे शहर, पुणे यांनी ही मागणी नाकारली .

आपल्या स्वत:ची मुलगी प्रियांका हिचा खून करुन पुरावा नष्ट केला, या आरोपाखाली अपीलकर्त्याविरुध्द पुण्याच्या सहकारनगर पोलिस ठाण्यात नोंद झालेला हा गुन्हा आहे. श्री. यशवंत ग्यानबा ननावरे व त्यांचा मुलगा निखिल यशवंत ननावरे या दोघांविरुध्द पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. या गुन्ह्याच्या संदर्भात तपासणी अंमलदार यांनी विधिसल्लागार, पोलिस आयुक्त कार्यालय, पुणे यांचे मत घेतले आहे, त्याची प्रत अपीलकर्त्याने मागितली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असून अपीलकर्ता हा स्वत:च आरोपी आहे त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (१) (ज) (छ) (त्र) मधील तरतुदीनुसार माहिती देण्यात येणार नाही असे अपील फेटाळताना अपिलीय प्राधिका-यानी म्हटले आहे.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर राज्य माहिती आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

हा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये पोलिस प्रॉसिक्युटर यांच्या संपूर्ण अभिप्रायाची छायांकित प्रत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे श्री. एस. पी. जाधव यांनी अपीलकर्त्याला द्यावी.

पुणे
दिनांक : २ /७ /२००७

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग पुणे.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर राज्य माहिती आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

हा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये पोलिस प्रॉसिक्युटर यांच्या संपूर्ण अभिप्रायाची छायांकित प्रत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे श्री. एस. पी. जाधव यांनी अपीलकर्त्याला द्यावी.

पुणे
दिनांक : २ /७ /२००७

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग पुणे.

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री.सुधीर माधव जोशी,
५८७,दत्तप्रसाद सोसायटी,
सिंहगड रोड,पुणे ३० अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
पोलीस सह आयुक्त, उत्तरवादी
पुणे शहर

जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, पुणे
श्री रवींद सेनगावकर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.६.२००७ |
| ३ | उपस्थित | **अपीलकर्ता**<br>श्री. सुधीर माधव जोशी<br>व्दारा वाय.वा.साबणे,<br>५८७, दत्तप्रसाद सोसायटी,<br>सिंहगड रोड, पुणे ३०<br>**जन माहिती अधिकारी तथा**<br>पोलीस उपायुक्त मुख्यालय ,<br>पुणे शहर.<br>श्री रवींद्र सेनगावकर |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.४.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | श्री. मकरंद पंढरीनाथ हगवणे यांच्याविरुध्द पोलीस आयुक्त व कोथरुड पोलीस ठाणे यांच्याकडे केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती. |

## विवेचन

श्री. मकरंद पा हगवणे यांच्याविरुध्द पोलीस आयुक्त व कोथरुड पोलीस ठाणे यांच्याकडे दि. ८.४.२००३ रोजी दिलेल्या तक्रारीवर पोलीसांनी केलेल्या कारवाईबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. सुधीर माधव जोशी यांनी मागितली आहे. श्री. जोशी यांनी दिलेल्या तक्रारीबाबत अलंकार पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक श्री.एम.बी.यादव यांनी त्यांचा जबाबही नोंदविला होता. त्या अनुषंगाने त्यांनी दि. ६.२.२००६ रोजी कारवाईबाबतची माहिती मागणारा अर्ज केला होता. परंतु कोथरुड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रसाद हसबनीस यांनी दि २१.३.२००६ रोजी त्यांना उत्तर पाठविले व 'अर्ज आल्याची नोंद आहे, परंतु अर्ज सापडत नाही,' असे कळविले. त्याविरुध्द श्री. जोशी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस सहआयुक्त यांच्याकडे अपील केले. पोलीस सहआयुक्त श्रीमती भारती कुराडे यांनी सुनावणी करुन त्यांचे अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री. जोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. दरम्यानच्या काळात तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पुण्याहून अन्यत्र बदल्या झाल्या आहेत. श्री. रवींद्र सेनगावकर यांनी दि. १९.६.२००७ रोजी पोलीस उपायुक्त मुख्यालय व जन

माहिती अधिकारी म्हणून कार्यभार स्वीकारला. त्यांनी तातडीने शोध घेऊन अलंकार चौकीचे पोलीस उपनिरीक्षक श्री.आर.आर.शेळके यांच्याकरवी जुन्या अभिलेखातून संबंधित कागदपत्रे शोधून काढली , हे नमूद करण्याजोगे आहे.

श्री. जोशी व श्री. हगवणे यांच्यामधील आर्थिक देण्याघेण्याच्या व्यवहारासंबंधीचा हा विषय आहे. दोघांनीही परस्परांविरुध्द न्यायालयामध्ये खाजगी दावे दाखल केले आहेत. पोलिसांनी श्री. जोशी यांच्या अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती आवश्यक त्या कागदपत्रासह त्यांना देण्यात आली आहे , असे श्री सेनगावकर यांनी सुनावणीत स्पष्ट केले. आपल्याला अपेक्षित असलेली माहिती आता मिळाली आहे. परंतु ती वेळेत मिळाली नसल्यामुळे आता तिचा उपयोग नाही , असे प्रतिपादन श्री. जोशी यांनी केले. श्री. जोशी यांची मुख्य मागणी माहितीपेक्षा पोलिसांनी कारवाई करण्याची आहे , तो विषय माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कक्षेतील नाही.

एकूण घटनाक्रम व संदर्भ लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अमान्य

२. नागरिकांनी मागितलेली माहिती नियमानुसार योग्य कालावधीत व नेमकी दिली जाईल , याची दक्षता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी घ्यावी .

पुणे
दि. ६.७.२००७

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे विभाग,पुणे

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. विकास हरीदास चव्हाण
मु.पो. अंजनगाव (खे.), ता. माढा, — अपीलकर्ता
जि. सोलापूर

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
तहसीलदार माढा, ता. माढा, — उत्तरवादी
जि. सोलापूर
श्री. विक्रांत शांतीलाल चव्हाण

जन माहिती अधिकारी तथा
गाव कामगार तलाठी, अंजनगाव (खे.)
ता. माढा, जि.सोलापूर
श्री. दिलखुश गुलाबशा काझी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/५/२००७ |

३ उपस्थित

**अपीलकर्ता** श्री. विकास हरीदास चव्हाण, मु.पो. अंजनगाव (खे.), ता. माढा, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार माढा, ता. माढा, जि. सोलापूर श्री. विक्रांत शांतीलाल चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी, अंजनगाव (खे.), ता. माढा, जि.सोलापूर श्री. दिलखुश गुलाबशा काझी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.१.२००७ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे अंजनगाव (खे.) येथील गट क्रमांक ८१५/१ ( गुरेचरण ) मध्ये झालेल्या अधिकृत /अनाधिकृत बांधकामाची माहिती दिलेल्या नमुन्यात मिळावी

## विवेचन

मौजे अंजनगाव (खे.), ता. माढा, जि. सोलापूर येथील गट क्रमांक ८१५ /१ (गुरेचरण) मध्ये झालेल्या अधिकृत /अनधिकृत बांधकामाची माहिती श्री. विकास हरीदास चव्हाण यांनी जन माहिती अधिकारी तथा गाव कामगार तलाठी, अंजनगाव (खे.), ता. माढा यांच्याकडे मागितली होती. ही माहिती आपल्याला पुढील नमुन्यात मिळावी असे त्यांनी म्हटले होते :

१) बांधकाम केलेले इसमाचे नांव / संस्थेचे नाव २) बांधकाम केलेले क्षेत्र ३) बांधकामाचा प्रकार ४) बांधकामास अधिकृत मंजुरी दिली आहे काय ५) अधिकृत मंजुरी असल्यास आदेश क्रमांक व दिनांक ६) अधिकृत मंजुरी दिलेले क्षेत्र ७) अनधिकृत बांधकाम असलेस त्याबाबत कायदेशीर कार्यवाही केल्यास त्याचा तपशील ८) कायदेशीर कारवाई केली नसल्यास त्याबाबतची कारणे

जन माहिती अधिकारी तथा गाव कामगार तलाठी, अंजनगाव (खे.) यांनी या नमुन्यात विहित मुदतीत माहिती दिली. परंतु ती चुकीची व अपुरी असल्याच्या कारणावरुन श्री. चव्हाण यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार माढा, ता. माढा जि. सोलापूर यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांचा निर्णय ग्राह्य मानून अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री. चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अपिलीय प्राधिका-यांनी दि. २१.११.२००६ च्या अपिलाची सुनावणी दि. १८.१२.२००६ रोजी घेतली. आपण माढा येथील निवासी नायब तहसीलदार व संबंधित लिपिक यांच्याकडे तेवीस वेळा

जाऊनही आपल्याला या अपिलाचा निर्णय मिळाला नाही, असे श्री. चव्हाण यांनी दि. १६.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलात म्हटले आहे. दरम्यान अपिलीय प्राधिका-यांनी दि. ३.१.२००७ रोजी दिलेला निर्णय दि. १७.१.२००७ रोजी अपीलकर्त्याला पाठविला गेला. आपल्या आजारपणामुळे निकाल पाठविण्यास विलंब झाला, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार माढा, जि. सोलापूर यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. तसेच उर्वरित माहितीही दिली गेल्याचे त्यांनी सांगितले. परंतु "अनधिकृत बांधकामाच्या जागी स्पष्ट अभिप्राय न नोंदविता जागा कोरी ठेवली आहे. तसेच गाव कामगार तलाठी, अंजनगाव (खे.), यांनी सदर विषयी दिलेल्या माहितीच्या परिशिष्ट क्र.१ मधील अ.क्र.१ ते २५ मधील इसमांची बांधकामे अधिकृत असल्याचे दर्शवून मंजुरी देण्यात आल्याचे आदेश 'तलाठी दप्तरी आढळून येत नाही ' अशी विसंगत माहिती दिली. ग. नं. ८१५/१ (गुरेचरण) चे क्षेत्र महसूल विभागाच्या अधिपत्याखाली असताना देखील सदर क्षेत्रामधील जागा अ.क्र. २१ ते २५ मधील इसमांना ग्रामपंचायतद्वारे दिली असे दर्शवून माझी दिशाभूल करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अ. क्र. २६ ते ३५ मधील इसमांची बांधकामे अनधिकृत असून देखील सदर इसमांना जागा ग्रामपंचायतीने दिली आहे अशी चुकीची माहिती दिली आहे," असे श्री. चव्हाण यांनी लेखी व तोंडी नमूद केले. श्री. विकास हरीदास चव्हाण यांनी नमूद केलेली बांधकामे गट क्रमांक १ मध्ये दर्शविली आहेत, प्रत्यक्षात ती बांधकामे गट क्रमांक ८१५/२ मध्ये आहेत, असे जन माहिती अधिका-यांनी सांगितले. तसेच, अपीलकर्ता स्वतः एक लाभार्थीधारक असून १९९८ साली ग्रामपंचायतीने ठराव करुन त्यांना तीन गुंठे क्षेत्र दिले आहे, असेही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. 'तलाठी दप्तरी आढळून येत नाही' असे नमूद केलेली कागदपत्रे अपीलकर्त्याला दिली जाणे आवश्यक आहे. तहसीलदार, माढा यांच्या ज्या आदेशान्वये फेरफार नोंद करण्यात आली तो आदेश, तसेच गट विकास अधिका-यानी घरकुलाचे वाटप करताना दिलेला नेमका आदेश याची माहिती दिली गेलेली नाही, हे अपीलकर्त्याने स्पष्ट केले आहे. ही माहिती दिली पाहिजे.

अशी माहिती आपल्या पातळीवर त्यावेळी देता आली नाही. परंतु दि. ३१.५.२००७ पर्यंत उर्वरित माहिती आपण देऊ, असे जन माहिती अधिकारी तथा तलाठी अंजनगाव (खे.), ता. माढा, जि. सोलापूर श्री. दिलखुश गुलाबशा काझी यांनी आयोगापुढील सुनावणीत कबुल केले. अपिलीय

प्राधिकारी तथा तहसीलदार माढा, जि. सोलापूर श्री. विक्रांत शांतीलाल चव्हाण यांनी त्याला दुजोरा दिला.

उभय बाजूंची निवेदने व विषयाचा तपशील लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२. फेरफार नोंदीबाबतचा तहसीलदार, माढा यांचा आदेश व घरकुले वाटपाबाबतचा गट विकास अधिकारी, माढा यांचा आदेश यासह उर्वरित माहिती दि. ३१.५.२००७ पर्यंत देण्याबाबत आयोगा दिलेल्या हमीबाबतचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक आठवड्यात आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि. ३०.७.२००७**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. मौलासाब जमालसाब सगरी,
चेअरमन, सहराई सुतार फर्निचर
उत्पा.सह. संस्था मर्या., सोलापूर, — अपीलकर्ता
८५/४, रविवार पेठ, सोलापूर

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
उप विभागीय अधिकारी, — उत्तरवादी
सोलापूर विभाग, सोलापूर
श्री. श्रीमंत पाटोळे

जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अव्वल कारकून,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, सोलापूर
श्री. चिदानंद तायप्पा हळ्ळी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/५/२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मौलासाब जमालसाब सगरी, चेअरमन,सहराई सुतार फर्निचर
उत्पा.सह. संस्था मर्या., सोलापूर, ८५/४, रविवार पेठ, सोलापूर

**जन माहिती अधिकारी तथा** आस्थापना अव्वल कारकून,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. चिदानंद तायप्पा हळ्ळी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.१.२००७ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१. आरटीएस अपिल नं.९/२००६ चे युक्तिवाद दि. १५.९.२००६ रोजी झालेला असून त्याचा निर्णय किती दिवसात करणे बंधनकारक आहे
२. आरटीएस अपिल नं.९/२००६ ही फाईल तीन ते चार वेळा अर्ज देऊनही तपासणी करणेकामी उपलब्ध झाली नाही. फाईल तपासणीसाठी न दिल्याने त्याबाबत नियम व फी काय आहे व फाईल किती दिवसात दिली जाते
३. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाप्रमाणे किती दिवसात महसूल बोजा अगर दंडाची रक्कम मुदतबाह्य होते
४. फेरफार अर्ज प्राप्त झाल्यापासून तलाठी व मंडल अधिकारी किती दिवसात चौकशी करुन फेरफाराची नोंद करावी. तसे मुदतीत न केल्यास तो अर्ज ना मंजूर करावा काय, मंजूर होण्याचा कालावधी काय, तसेच नोंद मंजूर करण्यापूर्वी संबंधिताना पूर्वनोटीस देण्यात येत काय

## विवेचन

जमीनीवरील हक्क नोंदणीच्या संदर्भात केलेल्या अपिलाच्या निर्णयाची प्रत व संबंधित संचिका तपासणीस परवानगी मिळावी, या मूळ मागणीसाठी अपीलकर्ता श्री. मौलासाब जमालसाब सगरी यांनी जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय,

सोलापूर यांच्याकडे अर्ज केला होता. हक्क नोंदणीच्या संदर्भात आपण केलेल्या अपिलाचा निर्णय किती दिवसात करणे बंधनकारक आहे, फेरफार अर्ज प्राप्त झाल्यापासून किती दिवसात उता-यावर त्याची नोंद करावी, अशा एकूण चार मुद्दयांची माहिती त्यांनी मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी या सर्व मुद्दयांवर पुढीलप्रमाणे स्पष्टीकरणात्मक माहिती दिली :

१. आरटीएस फेरतपासणी/९/२००६ मध्ये दि. १५.९.२००६ रोजी अर्जदार यांनी लेखी म्हणणे सादर केले आहे. रोजनामा यावर सदर दिवशी रेकॉर्ड मागविणे असे आदेशित केले आहे. निर्णय किती दिवसात द्यावा याबाबत कायद्यात तरतूद नाही.

२. दि. १५.९.२००६ रोजी अर्जदार यांनी लेखी म्हणणे दाखल केले असल्याने पुन्हा संचिकेची मागणी केली नाही. त्यामुळे संचिका दिली नाही म्हणून संबंधित कारकुनाबद्दल कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. कोणत्याही अपिलाचे कागदपत्र संबंधित पक्षकार अथवा त्यांचे विधिज्ञ यांनी मागणी केल्यास पाहणेसाठी त्वरित उपलब्ध करुन दिले जातात. त्यासाठी फीची आकारणी केली जात नाही. दि. ७.१०.२००६ रोजी अर्जदार यांनी फाईल तपासणीकामी मागणी केली नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

३. एखाद्या व्यक्तीकडे शासकीय प्राधिकरणाकडील येणे बाकी असेल तर प्राधिकरणाने उक्त रकमेचा बोजा संबंधित इसमाच्या मिळकतीवर दाखल करणेसाठी लेखी आदेश दिला असल्यास संबंधित तलाठ्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५० मधील तरतुदीनुसार त्याची नोंद फेरफार नोंदवहीस तात्काळ घेणे बंधनकारक आहे.

४. मुद्दा क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे तलाठी यांनी तात्काळ नोंद करण्याची तरतूद आहे व नोंद धरुन घेतल्यानंतर व नियमानुसार संबंधितांना नोटिसा बजावणीनंतर १५ दिवसांच्या नंतर मंडल अधिकारी यांनी नोंद निर्गत करणे बंधनकारक आहे. अशा प्रकारच्या आदेशाच्या नोंदी मंजूर करणेपूर्वी अधिनियमातील कलम १५० अ, ब मधील कार्यपध्दती क्र. ३६ अन्वये संबंधितांना नोटीस बजावणेची तरतूद नाही.

परंतु आपल्याला चुकीची माहिती मिळाल्याच्या कारणावरुन श्री. सगरी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्याकडे अपील केले. मुद्दा क्र. ३ व ४ मधील माहिती मिळाली नाही व संचिका तपासणीस दिली गेली नाही. ती न देणा-या

कारकुनावर कोणत्या प्रकारे कारवाई केली याची माहिती दिली नाही, असे अपिलात नमूद केले होते. अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांचा निर्णय ग्राह्य मानून अपील निकालात काढले. त्याविरुध्द श्री. सगरी यांनी प्रथम अपिलातील मुद्दयांप्रमाणे माहिती मिळाली नसल्याचे नमूद करुन राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

हक्क नोंदणीबाबतच्या अपिलाचा निकाल झाला आहे. त्यामुळे आता संचिकेची तपासणी आपल्याला करावयाची नाही, असे श्री. सगरी यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. मात्र माहिती अधिका-यांनी पूर्ण माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिका-यांनी कायद्याने विहित केलेल्या ४५ दिवसांच्या मुदतीत अपिलाचा निर्णय केला नाही, त्याबद्दल त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. श्री. सगरी यांनी मूळ अर्जात मागितलेली सर्व माहिती दिली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी सांगितले. जन माहिती अधिका-यांनी विहित मुदतीत माहिती दिली आहे, असे दिसते. प्रथम अपिलाचा निर्णय मात्र ४५ दिवसांच्या विहित मुदतीत दिलेला नाही.

संबंधित कागदपत्रे व उभय बाजूंची निवेदने लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

१. अपील अमान्य.

२. अपिलाचा निर्णय विहित मुदतीत करण्याची समज अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सोलापूर विभाग, सोलापूर श्री. श्रीमंत पाटोळे यांना देण्यात येत आहे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. ३०.७.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. धनाजी अनंता चव्हाण
मु.पो.सुस्ते, ता. पंढरपूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
प्रभारी तहसीलदार, पंढरपूर, ता. पंढरपूर,
जि. सोलापूर — उत्तरवादी
श्री. विवेक साळुंके

जन माहिती अधिकारी तथा
गाव कामगार तलाठी, सुस्ते,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर
श्री. जी. बी. गवळी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | ३०/५/२००७ |

**३ उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. धनाजी अनंता चव्हाण, मु.पो.सुस्ते, ता. पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभारी तहसीलदार, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर श्री. विवेक साळुंखे

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी, सुस्ते, ता. पंढरपूर, जि. सोलापूर श्री. जी.बी.गवळी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.२.२००७ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे सुस्ते, ता. पंढरपूर येथील पूरग्रस्तांबाबतची व धनादेश वाटपाबाबतची माहिती, व गावचा पूरनियंत्रण रेषेचा नकाशा

## विवेचन

मौजे सुस्ते, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथील पूरग्रस्तांबाबतची माहिती, तसेच सुस्ते गावचा पूरनियंत्रण रेषेचा नकाशा अपीलकर्ता श्री. धनाजी आनंत चव्हाण यांनी तालुका कृषि अधिकारी, पंढरपूर, जि. सोलापूर यांच्याकडे दि. १७.११.२००६ रोजी मागितला होता. 'सुस्ते गावात ४९४ शेतक-यांचे ५९१.७६ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झालेले आहे व नुकसान भरपाई पोटी रु. ५८,९०,४९५/- एवढी रक्कम पूरबाधित शेतक-यांना वाटप करण्यात आली आहे,' अशी माहिती तालुका कृषि अधिकारी, पंढरपूर यांनी दिली. मात्र 'पूरनियंत्रण रेषेच्या नकाशाबाबत तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, पंढरपूर यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा,' असे कळविले. श्री. चव्हाण यांनी दि. ५.१२.२००६ रोजी नकाशासाठी तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, पंढरपूर, यांच्याकडे अर्ज केला. 'मौजे सुस्ते, ता. पंढरपूर, येथील पूर आलेल्या गाव नकाशावर पुराच्या रेषा मारुन सदरचा नकाशा तहसीलदार कार्यालय, पंढरपूर यांचेकडे जमा करणेत आला आहे. सदर नकाशाचे काम तहसीलदार यांचेकडे वर्ग करण्यात आले आहे. त्यामुळे नकाशाची नक्कल देण्यात येत नाही, याची पोहच घ्यावी. सदरचा नकाशा पुरविता येत नाही,' असे तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, पंढरपूर यांनी कळविले. नकाशा न मिळणे व अपुरी माहिती मिळणे या कारणांवरून श्री. चव्हाण यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पंढरपूर यांच्याकडे दि. ११.१.२००७ रोजी अपील केले. 'पूरग्रस्तांबाबत देण्यात आलेली माहिती अपुरी नाही, पूर्ण आहे,' असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा

तहसीलदार यांनी दिला. तसेच 'पूरग्रस्त गावाचा नकाशा या कार्यालयात उपलब्ध नसल्याने देता आला नाही,' असे कळविले. त्याविरुध्द श्री. चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. त्याची सुनावणी दि. १८.५.२००७ रोजी निश्चित करण्यात आली होती, परंतु जन माहिती अधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी हे दोघेही उपस्थित राहिले नाहीत, तसेच अपीलकर्ता श्री. धनाजी अनंता चव्हाण हेही उपस्थित नव्हते. सुनावणीसाठी पंढरपूर तहसील कार्यालयातील लिपिक श्री. अजित तुकाराम जाधव यांना पाठविले. त्यामुळे त्या दिवशी सुनावणी न घेता संबंधितांकडून अनुपस्थितीबाबत स्पष्टीकरण मागवून दि. ३०.५.२००७ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सुस्ते, ता. पंढरपूर येथे भीमा नदीला आलेल्या महापुरात झालेल्या हानीत बनावट पूरग्रस्तांचा समावेश झाला आहे, त्यांना अनुदान दिले गेले आहे व शासनाची फसवणूक करण्यात आली आहे, असे श्री. चव्हाण यांनी दि. १७.११.२००६ रोजी केलेल्या अर्जात नमूद केले आहे. पूरनियंत्रण रेषेचा नकाशा मिळण्यासाठी त्यांनी दि. ५.१२.२००६ रोजी अर्ज केला. तालुका कृषि अधिका-यांनी पूरग्रस्तांची संख्या कळविली. परंतु मागणीनुसार पूरग्रस्तांची यादी दिली नाही. नंतर यादी दिली, मात्र ती अपुरी होती. 'त्यात एका व्यक्तीचे नावे दोन धनादेश काढल्याचे दिसते, तसेच काही लाभधारक तालुक्याच्या बाहेरचे असून त्यांचा पुराशी व पूरग्रस्त गावाशी काहीही संबंध नाही,' असे चव्हाण यांनी अपिलात नमूद केले आहे. यादीत काही नावे दोनदा आली आहेत, हे खरे असले तरी त्यांना धनादेश दिले गेलेले नाहीत, असे जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सुस्ते ता. पंढरपूर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पंढरपूर यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. यादीची शहानिशा व चौकशी करण्याची मागणी श्री. चव्हाण यांनी अर्जाप्रमाणे सुनावणीतही केली, परंतु हा राज्य माहिती आयोगाच्या कक्षेतील विषय नाही.

आपण रानात राहतो, गावाची पूरनियंत्रण रेषा कळली की घर कोठे बांधावे याबाबतचा निर्णय आपल्याला घ्यावयाचा होता, म्हणून पूरनियंत्रण रेषेचा नकाशा तातडीने आपल्याला मिळणे आवश्यक होते, असे प्रतिपादन श्री. चव्हाण यांनी केले. हा नकाशा देण्याबाबत तालुका कृषि अधिकारी, तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख व तहसीलदार, पंढरपूर या तीनही कार्यालयांनी टोलवा टोलवी केली, असा श्री. चव्हाण यांचा आक्षेप आहे. कागदपत्रातून तो सिध्द होतो. मात्र या नकाशाबाबतचे काम अद्यापही पूर्ण झाले नाही, त्यामुळे तो देता आला नाही, असे तहसीलदार, तालुका कृषि अधिकारी, तालुका

निरीक्षक, भूमि अभिलेख यांनी स्पष्ट केले. तयार झालेला प्राथमिक नकाशा फेब्रुवारी २००७ मध्ये श्री. चव्हाण यांना देण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले व श्री. चव्हाण यांनी ते मान्य केले. पूरनियंत्रण रेषेच्या नकाशाचे काम आता सुरु असून नकाशाला अंतिम स्वरुप दिल्यानंतर त्याची प्रत श्री. चव्हाण यांना दिली जाईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पंढरपूर यांनी मान्य केले.

पूरनियंत्रण रेषेचा नकाशा विशिष्ट वेळेत मिळणे अपीलकर्त्याच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. परंतु तो तयार होण्यासाठी लागलेल्या कालावधीमुळे तो अपीलकर्त्याला दिला गेलेला नाही, हे उभय बाजूंच्या निवेदनावरुन दिसून येते. तातडीच्या महत्त्वाच्या विषयाबाबत माहितीची पूर्तता करण्यास होणारा विलंब नागरिकांच्या दृष्टीने हानीकारक ठरु शकतो, याची जाणीव संबंधित अधिका-यांनी ठेवणे आवश्यक आहे, हे यातून स्पष्ट होते. त्याची जाणीव संबंधितांना करून देण्यात येत आहे.

वरील माहिती लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२. पूरनियंत्रण रेषेचा नकाशा पूर्ण होताच अपीलकर्त्यास निःशुल्क देण्यात यावा व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा. ही जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पंढरपूर, जि. सोलापूर यांची राहील.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. ३१.७.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. सुभाष भिमराव गावसाने,
मु.पो.साकत, ता. बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरु ध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
गट विकास अधिकारी वर्ग-१
पंचायत समिती, बार्शी ,
ता.बार्शी, जि. सोलापूर
श्री. एस.के.चिल्लाळ — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, बार्शी, ता. बार्शी, जि.सोलापूर
श्री. व्ही. एम. मुंढे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/५/२००७ |

**३ उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी वर्ग-१,
पंचायत समिती बार्शी ता.बार्शी , जि. सोलापूर श्री. एस.के.चिल्लाळ

**जन माहिती अधिकारी तथा** गट शिक्षण अधिकारी,
पंचायत समिती बार्शी, ता. बार्शी, जि.सोलापूर श्री. व्ही. एम. मुंढे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.८.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.१०.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

नवनिर्वाचीत ग्रामशिक्षण समिती, साकत, ता. बार्शी अस्तित्वात आल्यापासून ते अद्यापपर्यंत सदर समितीचे बँक व्यवहार करणेसाठी ज्यांना ज्यांना ज्या ज्या ठरावाद्वारे अधिकार दिलेले आहेत त्या त्या ठरावाची सही शिक्याची नक्कल

## विवेचन

साकत, ता. बार्शी येथील नवनिर्वाचित ग्रामशिक्षण समिती अस्तित्वात आल्यापासून या समितीचे बँक व्यवहार करण्यासाठी ठरावाद्वारे अधिकार देण्यात आलेल्या व्यक्तींच्या नावांसह, ठरावांची प्रमाणित नक्कल श्री. सुभाष भिमराव गावसाने यांनी दि. ८.८.२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, बार्शी , जि. सोलापूर यांच्याकडे मागितली होती. दि. ३१.१.२००६ रोजी नवीन ग्रामशिक्षण समिती अस्तित्वात आली. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेच्या शाखा पानगाव, ता. बार्शी येथील खात्यातील रक्कम काढण्यासाठी फक्त पत्र देण्यात आले आहे, ठराव झालेला नाही, असे जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षण अधिका-यांनी श्री. गावसाने यांना कळविले. तसेच नवीन शासकीय नियमानुसार राष्ट्रीयीकृत बँकेत खाते उघडणे बंधनकारक असल्यामुळे बँक ऑफ इंडिया, शाखा पानगाव ता. बार्शी येथे खाते उघडून बँक व्यवहार करण्याबाबतचे अधिकार संबंधित व्यक्तींना दिल्याच्या ठरावाची नक्कल प्रभारी मुख्याध्यापक, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, साकत, ता. बार्शी यांचे सही -शिक्क्यानिशी श्री. गावसाने यांना देण्यात आली, मात्र गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, बार्शी यांनी ती प्रमाणित केलेली नाही. तसेच दि. २१.६.२००६ रोजी झालेल्या या ठरावापूर्वी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा पानगाव, ता. बार्शी येथे असलेल्या खात्यावरील व्यवहार करण्याबाबतच्या ठरावाच्या नकला दिलेल्या नाहीत. त्याविरुध्द श्री. गावसाने यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग - १, पंचायत समिती, बार्शी यांच्याकडे अपील केले. द्यावयाची राहिलेली माहिती दि. ११.१०.२००६ पर्यंत देण्याचे

जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी यांनी तेथील सुनावणीत मान्य केले, असे अपिलीय प्राधिका-यांच्या निर्णयात म्हटले आहे. त्यानुसार माहिती दिली गेली नाही, म्हणून श्री. गावसाने यांनी दि. १७.१०.२००६ व दि. ३१.१०.२००६ रोजी अपिलीय प्राधिका-यांना स्मरणपत्रे पाठविली. त्यानंतर जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी यांनी दि. २१.११.२००६ रोजी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेतील खात्यातील आर्थिक व्यवहार करण्याच्या अधिकाराबाबतच्या पत्राची प्रत त्यांना दिली. माहिती देण्यास ३२ दिवस विलंब झाल्याचे नमूद करुन अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना प्रतिदिन रु. २५०/- प्रमाणे रु. ८०००/- दंड केला. परंतु केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अपिलीय प्राधिका-यांना शास्तीचा अधिकार नाही, म्हणून अपिलीय प्राधिका-यांनी ही शास्ती रद्द करणारा दुरुस्तीआदेश दि. ७.१२.२००६ रोजी दिला. ग्रामशिक्षण समितीचा आर्थिक व्यवहार करण्यासाठी केवळ पत्र प्रमाण मानले. आवश्यक असताना ठराव न केल्याबाबत दखल घेतली नाही व दंडात्मक कारवाईचा आदेश रद्द केला, या कारणावरुन श्री. गावसाने यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

या विषयाला साकत येथील ग्रामपंचायतीतील राजकारणाची पार्श्वभूमी आहे. ग्रामशिक्षण समितीचा आर्थिक व्यवहार करण्याचे अधिकार सरपंचाचे असताना महिला सरपंचाना बाजूला सारुन उपसरपंचानी स्वत: सह्यांचे अधिकार घेतले. त्याबाबतचा कोणताही ठराव झालेला नाही, हा वादाचा मुख्य विषय आहे, हे सुनावणीदरम्यान स्पष्ट झाले. राज्य माहिती आयोगाला त्याची दाखल घेण्याचे कारण नाही. माहिती दिली गेली की नाही व अपिलीय प्राधिका-यांनी दंडात्मक कारवाई रद्द करणे योग्य आहे की नाही, एवढेच आयोगापुढील प्रमुख मुद्दे आहेत.

आर्थिक व्यंवहाराविषयीच्या ठरावांबाबत अपुरी माहिती दिली गेली, ही वस्तुस्थिती आहे.

अपिलीय प्राधिका-यांनी मुळात दंड करताना अधिकाराची कक्षा लक्षात घेणे आवश्यक होते. परंतु माहिती अधिकाराविषयीच्या प्रशिक्षणानंतर शास्तीच्या अधिकाराबाबत स्पष्टता झाल्यामुळे आपण निर्णय रद्द केला, असे त्यांनी स्पष्ट केले. ऑक्टोबर २००५ मध्ये हा कायदा अस्तित्वात आला असून त्यांनी दिलेला निकाल दि. २३.११.२००६ चा आहे, म्हणजे जवळ जवळ वर्षभरानंतरचा आहे. वेगळ्या स्वरुपाचा व अत्यंत महत्त्वाचा असा हा कायदा आहे. एक वर्षाचा कालावधी उलटल्यानंतरही शासकीय अधिकाऱ्यांना त्याबाबत नेमकी माहिती असू नये, हे गंभीर आहे. परंतु शास्तीचा त्यांनी घेतलेला निर्णय

योग्य असून हा जणू काही राज्य माहिती आयोगानेच घेतला आहे, असे मानून तो कायम करण्यात येत आहे.

या विषयासंदर्भात पुढे आलेल्या माहितीचा विचार करता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बार्शी यांनी उर्वरित माहिती दि. १०.८.२००७ पर्यंत अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी.

३. अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, बार्शी यांनी जनमाहिती अधिकाऱ्यांना लावलेली शास्ती रु. ८०००/- आयोगाचा निर्णय म्हणून कायम करण्यात येत आहे. सदरची शास्ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१ ) ' या लेखाशिर्षाखाली दि. १०.९.२००७ पर्यंत जमा करावी. अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग- १, पंचायत समिती,बार्शी यांनी ही शास्ती वसुल करुन तसा पूर्तता अहवाल आयोगाला पाठवावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. २५.७.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. महादेव नारायण बंडगर
मु. पो. माळीनगर, अपीलकर्ता
ता. माळशिरस, जि. सोलापूर

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
प्रभारी गट विकास अधिकारी (वर्ग-१) , उत्तरवादी
पंचायत समिती, माळशिरस,
ता. माळशिरस, जि. सोलापूर
श्री. जी. बी. भोसले

जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस,
ता. माळशिरस, जि. सोलापूर
श्री. अभिमन्यु अर्जुन जाधव

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/५/२००७ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. महादेव नारायण बंडगर, मु. पो. माळीनगर,
ता. माळशिरस, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभारी गट विकास अधिकारी (वर्ग-१) , पंचायत समिती,
माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर श्री. जी. बी. भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस,
ता.माळशिरस, जि. सोलापूर श्री. अभिमन्यु अर्जुन जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.११.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे माळीनगर व मौजे सवतगव्हाण येथील सन २०००-२००१, २००२-२००३, २००५ - २००६ सालातील घरकुल लाभार्थींची यादी, महिला बालकल्याण व समाजकल्याण या विभागांमार्फत राबविलेल्या योजनांतील लाभार्थ्यांची यादी

## विवेचन

मौजे सवतगव्हाण व माळीनगर येथील घरकुल लाभार्थी, तसेच महिला बालकल्याण व समाजकल्याण या विभागांमार्फत राबविलेल्या योजनेतील सन २००० ते २००३ व २००५-२००६ मधील लाभार्थ्यांची यादी अपीलकर्ता श्री. महादेव नारायण बंडगर यांनी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी संबंधित कर्मचा-यांकडून ही माहिती संकलित करुन केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार ३० दिवसांच्या विहित मुदतीत श्री. बंडगर यांना दिली. परंतु अपूर्ण माहिती

मिळाल्याच्या कारणावरुन त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१ ), पंचायत समिती, माळशिरस, यांच्याकडे अपील केले. सन २०००-२००१ मधील मौजे माळीनगर येथील डोंबारी समाजाच्या १७ घरकुलांची माहिती दिली गेली नाही, असे त्यांनी या अपिलात म्हटले होते. तसेच लाभार्थ्यांची निवड चुकीच्या पध्दतीने केली असून लाभार्थी बनावट आहे, असा आरोपही त्यात केला होता. अर्जदाराने मागितलेली मौजे माळीनगर व सवतगव्हाण या दोन ग्रामपंचायतींमधील लाभार्थ्यांची यादी त्यांना देण्यात आली आहे, ही यादी वस्तुनिष्ठ आहे, चुकीची अथवा बनावट नावे नाहीत, असे संबंधित कर्मचा-यांनी स्पष्ट केले आहे, असे अपिलीय प्राधिका-यांनी दिलेल्या निर्णयात नमूद केले आहे. त्याविरुध्द श्री. बंडगर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. मिळालेली माहिती अपुरी व दिशाभूल करणारी आहे, असे त्यात नमूद केले असून लाभार्थींची निवड वशिलेबाजीने व मनमानी पध्दतीने केली आहे. ग्रामपंचायत सदस्य असताना संबंधित व्यक्तींने कुटुंबातील व्यक्तीच्या नावे लाभ घेतला आहे, असा आरोप करुन या संदर्भातील सविस्तर माहिती मागितली आहे.

प्रथम अर्जात श्री. बंडगर यांनी लाभार्थ्यांची यादी मागितली. प्रथम अपिलात अपात्र व्यक्तींना लाभ मिळाला असल्याचे नमूद करुन त्यांनी कारवाईची मागणी केली. राज्य माहिती आयोगापुढील अपिलात त्यांनी अशा स्वरुपाचे आरोप करुन केवळ यादीपुरते मर्यादित न रहाता घरकुलांचे पैसे वाटप, घरकुलांच्या बांधकामाची स्थिती अशा सविस्तर माहितीची मागणी केली आहे.

महिला व बालकल्याण योजनेमधील श्रीमती सुप्रिया प्रकाश निंबाळकर या लाभार्थीच्या कागदपत्रांची मागणी मूळ अर्जात करण्यास आपण विसरलो, ती कागदपत्रे मिळावीत, असे माहिती स्वीकारताना श्री. बंडगर यांनी सांगितले. ती माहिती त्यांना दोन दिवसात पुरविण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी श्री. जाधव यांनी सांगितले. श्री. बंडगर यांनी ते मान्य केले. लाभार्थ्यांच्या यादीसंबंधीच्या आक्षेपांबाबतची कारवाई माहितीचा अधिकार कायद्याच्या कक्षेबाहेरची असल्याचे अपिलीय प्राधिका-यांनी नमूद केले आहे, ते रास्त आहे.

उभय बाजूंची निवेदने व संबंधित कागदपत्रे पहाता श्री. बंडगर यांना मूळ अर्जात मागितलेली माहिती दिली गेली आहे, असे दिसते. लाभार्थ्यांच्या यादीत निवड झालेल्या व्यक्तींची पात्रता - अपात्रता,

त्याबाबत करावयाची कारवाई आदि बाबी माहितीचा अधिकार अधिनियम कक्षेतील नाहीत. तसेच अर्ज व अपिलात व प्रत्येक पातळीवर अतिरिक्त माहिती मागता येणार नाही.

आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दिनांक :- २६/७/२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. मिन्हाजोद्दीन ताजोद्दीन काझी
न्यु धोंडीबा वस्ती, शिवलाल पुढारी
चाळीच्या पाठीमागे, रामवाडी, सोलापूर — अपीलकर्ता
जि. सोलापूर

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
अध्यक्ष, उर्दू मदत शाळा, खानापूर, — उत्तरवादी
ता.अक्कलकोट, जि. सोलापूर
श्री. मोहद्दीन महंमद बिराजदार

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
उर्दू मदत शाळा, खानापूर,
ता.अक्कलकोट, जि. सोलापूर
श्री. लाडलेसाब घुडूभाई साचे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८५ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/५/२००७ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मिन्हाजोद्दीन काझी, न्यु धोंडीबा वस्ती,
शिवलाल पुढारी चाळीच्या पाठीमागे, रामवाडी, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, उर्दू मदत शाळा खानापूर,
ता.अक्कलकोट, जि. सोलापूर श्री. मोहद्दीन महंमद बिराजदार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.४.२००६ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षामध्ये दाखल झालेल्या दाखल्याची नक्कल, जून ते ऑक्टोबर २००५ इ. १ ली ते ५ वी विद्यार्थी हजेरीच्या प्रती, दि.१.९.२००५ चे शेरा नक्कल, दि. ७.१०.२००५ रोजी सन २००५-०६ संच मान्यतेसाठी दाखल केलेल्या प्रस्तावाची नक्कल, श्री. जावेद हुसेन काझी यांचे प्रस्तावाची नक्कल, सन २००५ पासून शालेय शिक्षण समितीचे मिटिंगचे प्रोसिडिंग नक्कल व विद्यार्थ्यांचे हजेरी नोंद नक्कल, सन २००५ पासून तांदूळ शिजवून दिलेले नोंद बुक व तांदूळ मागणी पत्रकाची नक्कल, सन २००४.०५, २००५-२००६ जनरल रजिस्टरच्या नकला

## विवेचन

अपीलकर्ता श्री. मिन्हाजोद्दीन ताजोद्दीन काझी यांनी दि. ४.१०.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रभारी मुख्याध्यापक, उर्दू मदत शाळा, खानापूर यांच्याकडे सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षामधील विद्यार्थ्यांची हजेरी आदि नऊ मुद्दयांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी त्यांच्या अर्जाला उत्तर दिले नाही. अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, उर्दू मदत शाळा, खानापूर, पो. म्हैसलगी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर यांनी अपिलाची कोणतीही दखल घेतली नाही, उलट, वेळेत अपील दाखल केले नसल्याचे कारण दाखवून ते फेटाळले. म्हणून श्री. काझी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.४.२००६ रोजी दाखल केलेल्या अपिलाची सुनावणी दि. २०.२.२००७ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळी काहीही न कळविता उत्तरवादी अनुपस्थित राहिले व अपीलकर्त्याने सुनावणीस येणे शक्य नसल्याचे कळविले. त्यानंतर दि. २२.३.२००७ रोजी सुनावणी ठेवण्यात आली तेव्हाही जन माहिती अधिकारी अथवा अपिलीय प्राधिकारी किंवा संस्थेचे अन्य कोणतेही प्रतिनिधी उपस्थित राहिले नाहीत, तसेच त्याबाबत त्यानी काही कळविलेही नाही. अपीलकर्ता श्री. काझी मात्र त्यावेळी उपस्थित होते. माहितीचा अधिकार अधिनियम कायद्यान्वये मागितलेल्या माहितीबाबत

अपिलीय प्राधिकारी व संस्थेचे अध्यक्ष बेफिकिरी दर्शवीत असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिला :

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपील फेटाळण्याचे दिलेले कारण चुकीचे आहे, जन माहिती अधिका-यांनी माहितीच दिलेली नसल्यामुळे नियमाप्रमाणे ३० दिवस प्रतीक्षा करुन प्रथम अपील दाखल केलेले आहे.

३. दि. ३.३.२००६ रोजी प्रथम अपील केले. त्यानंतर आज दि. २२.३.२००७ पर्यंत म्हणजेच वर्ष उलटून गेल्यानंतरही अपीलकर्त्याला कोणतीही माहिती मिळालेली नाही. त्यामुळे जन माहिती अधिका-यांना रु. २५,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. संस्थेच्या अध्यक्षानी ही शास्ती माहे एप्रिल २००७ पासून चार महिन्यांच्या त्यांच्या वेतनातून समान हप्त्यात वसूल करावी. आयोगाला तसा पूर्तता अहवाल पाठवावा.

४. श्री. काझी यांना हवी असलेली कागदपत्रे कोणतेही शुल्क न आकारता दि. १५ एप्रिल २००७ पर्यंत द्यावीत.

त्यानंतर श्री. मोहद्दीन महंमद बिराजदार, अध्यक्ष, उर्दू मदत शाळा, खानापूर, पो. म्हैसलगी, ता. अक्कलकोट यांनी या निर्णयाचा फेरविचार करण्याची व दरम्यानच्या काळात शास्तीच्या निर्णयाला स्थगिती देण्याची विनंती दि. २५.४.२००७ रोजी ॲड. अजमोद्दीन न. शेख यांच्यामार्फत अर्जाद्वारे केली. पुनर्विलोकनाची विनंती करणारा त्यांचा हा अर्ज आयोगाने दाखल करुन घेतला. याआधी दोन वेळा सुनावणीची संधी दिली असतानाही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित राहिले नव्हते, तसेच त्यांनी कोणतेही लेखी निवेदन सादर केले नव्हते. तरीही त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यासाठी दि. २२.३.२००७ च्या आदेशाला स्थगिती देऊन दि. ३०.५.२००७ रोजी सुनावणी घेण्यात आली.

दि. २२.३.२००७ च्या आदेशात विवेचनात नमूद केल्याप्रमाणे संस्थेने श्री. काझी यांनी माहिती देण्याबाबत, तसेच त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीबाबत केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियमांचे पालन केलेले नाही, हे उभय बाजूंच्या प्रदीर्घ निवेदनांमधून आयोगापुढील सुनावणीत स्पष्ट झाले. मात्र

आयोगापुढील आधीच्या दोन सुनावण्यांची नोटीस आपल्याला वेळेत मिळाली नाही, म्हणून आपण उपस्थित राहू शकलो नाही अगर निवेदन सादर केले नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, उर्दू मदत शाळा श्री. मोहद्दीन महंमद बिराजदार यांनी सांगितले. मात्र,अशी वस्तुस्थिती असल्याचे गृहीत धरले तरी ती नमूद करुन त्या त्या तारखेनंतर लेखी निवेदन पाठविणे शक्य होते, ते का केले नाही, याबाबत कोणतेही स्पष्टीकरण ते देऊ शकले नाहीत. आयोगाचा अनादर करण्याची आपली भूमिका नसल्याचे त्यांनी विनंतीपूर्वक नमूद केले.

५०-६० विद्यार्थ्यांची संख्या असलेली अत्यंत छोटी अशी ही शाळा आपण पदरचे पैसे खर्च करुन चालवीत असून अनेक कारणांमुळे शिक्षण खात्याकडून मिळणारे अनुदान रोखून धरण्यात आले आहे. श्री. काझी यांच्या संदर्भात उभय बाजूंतर्फे न्यायालयीन प्रक्रिया सुरु आहे. शाळेची आर्थि स्थिती डबघाईला आलेल्या अवस्थेत आहे. शाळेच्या सर्वसाधारण खर्चासाठी लागणारी रक्कमही आता आपल्यापाशी नसून, जमीन विकून आपण काही खर्च भागविला आहे, तसेच इतर अन्य खर्चाबाबतही करावे लागेल. विद्यमान मुख्याध्यापकांचा पगारही गेल्या अनेक महिन्यांपासून आपण देऊ शकलो नाही, असे निवेदन श्री. बिराजदार यांनी केले. श्री. काझी यांनी आपल्यावर अत्यंत हलाखीत दिवस कंठण्याची वेळ आली आहे, असे नमूद केले. शाळेची आर्थिक स्थिती बिकट असल्याचे श्री. काझी यांच्यासह सर्व उपस्थितांनी मान्य केले. मात्र श्री. बिराजदार यांनी स्वत:ची जमीन आदि मालमत्ता विकून शाळा चालवीत असल्याचे केलेले निवेदन सत्य नाही, असे प्रतिपादन श्री. काझी व त्यांचे वकील ॲड. अजमोद्दीन न. शेख यांनी केले. परस्परांविरुध्दच्या न्यायालयीन कारवाईत उभय बाजूंनी आताप काही लाख रुपये खर्च केले आहेत, असे आयोगाने केलेल्या विचारणेतून स्पष्ट झाले. एकीकडे शाळा चालविण्याला किंवा व्यक्तिगत चरितार्थासाठी पैशाची चणचण आहे, आणि दुसरीकडे न्यायालयीन कारवाईसाठी व्यक्तिगत मालमत्ता विकून वा अन्य प्रकारे पैसा उभा करण्यासाठी उभय बाजू ईर्षेने झटत आहेत, असे यातून स्पष्ट होते.

वरील पार्श्वभूमीवर, केवळ माहिती मिळणे - न मिळणे अगर देणे -न देणे एवढ्यापुरता विचार न करता आयोगाने एकूण परिस्थिती लक्षात घेऊन उभय बाजू करीत असलेला वेळेचा, पैशाचा व शक्तीचा अपव्यय त्यांच्या ध्यानी आणून दिला. हा अपव्यय टाळून एकत्र येऊन काम केल्यास शाळा

चालविता येईल व प्रश्न सोडविता येतील याची जाणीव आयोगाने त्यांना करुन दिली. उभय बाजूंनी ते मान्य केले, व स्वतंत्रपणे चर्चा करण्यास अवधी घेतला. तशी चर्चा त्यांनी केली.

शाळा न्यायाधिकरण, सोलापूर यांच्या आदेशानुसार (श्री. मिन्हाजोद्दीन काझी यांचे वेतन आदीबाबत ) कार्यवाही करण्यात येईल, अशी तडजोड झाल्याचे उभय बाजूंनी आयोगापुढे एकत्रितपणे निवेदन केले. याबरोबरच

अ) नवीन शैक्षणिक वर्षात दि. १५.७.२००७ पासून श्री. काझी यांना शाळेत रुजू करुन घेण्यात येईल व शिक्षण खात्याकडून अनुदान प्राप्त झाल्यावर त्यांचे वेतन देण्यात येईल.

ब) श्री. काझी यांनी मागितलेली सर्व माहिती त्यांना देण्यात यावी.

असेही ठरल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रमाणे कार्यवाही झाल्यास उभय बाजूंनी परस्परांविरुध्द न्यायालयीन कारवाई करावयाची नाही, याविषयीही एकमत झाल्याचे उभय बाजूंनी सांगितले.

'संस्थेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन जन माहिती अधिका-यास लावलेली शास्ती माफ करण्यात यावी,' अशी विनंती श्री. बिराजदार यांनी केली. वरीलप्रमाणे कार्यवाही झाल्यास शास्ती माफ करण्यास आपली हरकत नसल्याचे अपीलकर्त्याने सांगितले.

एकूण परिस्थिती लक्षात घेऊन आयोगाने शास्तीची कारवाई स्थगित करण्याचे सशर्त मान्य केले. उभय बाजूंनी मान्य केलेल्या व आयोगापुढे नमूद केलेल्या तडजोडीनुसार कार्यवाही झाल्याची माहिती आयोगाला सादर करावी. या पूर्ततेच्या अहवालानंतर अंतिम कार्यवाहीबाबतचा आदेश पारित केला जाईल, असे उभय बाजूंना स्पष्ट करण्यात आले आहे.

आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. दि. २२.३.२००७ च्या आदेशान्वये जन माहिती अधिका-यांना लावण्यात आलेली रु. २५०००/- ची शास्ती स्थगित करण्यात येत आहे.

२. आयोगाला दिलेल्या समझोत्याच्या माहितीची पूर्तता न झाल्यास आयोगाची दिशाभूल करण्याबाबत उभय बाजूंवर कारवाई करण्यात येईल, याची समज अपीलकर्ता आणि संस्थेचे अपिलीय प्राधिकारी यांना देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दिनांक :- ३१/७/२००७